# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## निवडणुकीदरम्यान 'डीप फेक' व्हिडीओ शेअर कराल, तर कारवाई; राज्य सरकारचे निर्देश

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणुकीदरम्यान डीप फेक व्हिडीओ क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करून तो समाजमाध्यमांमध्ये प्रसारित करण्याचा प्रकार दिवसेंदिवस वाढतो आहे. यासंदर्भात कारवाई करण्याची मागणी विविध स्तरातून होत असताना राज्य सरकारने या मागणीची दखल घेतली आहे. अशा प्रकारचा कंटेट शेअर करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश राज्य सरकारने पोलीस प्रशासनाला दिले आहेत. मागील काही दिवसांपासून फोटोशॉप, मशीन लर्निंग (एमएल) किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) यांसारख्या विविध तंत्रज्ञानाचा गैरवापर करून डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करण्यात येत आहे. निवडणुकीदरम्यान या तंत्राचा गैरवापर हा चिंतेचा विषय असल्याचे राज्य सरकारने म्हटले आहे. एखादा उमेदवार, राजकीय पक्ष किंवा निवडणुकीच्या मुद्द्याविषयी चुकीचे व्हिडीओ, ऑडिओ, फोटो तयार करण्यात येतात किंवा खऱ्या फोटो, ऑडिओ, व्हिडिओमध्ये फेरफार करून ते चुकीच्या पद्धतीने प्रसारित करण्यात येतात. असे गैरपद्धतीने तयार केलेले डीप फेक व्हिडीओज, क्लिप्स किंवा फोटो खरे असल्यासारखे भासतात आणि त्यामुळे संबंधिताविषयी गैरसमज किंवा बदनामी होते. त्यामुळेच राज्य सरकारने हे पाऊल उचलल्याचं सांगण्यात येत आहे.


(वर्ष ६३ वे अंक १२०) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.०४ मे २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


# राजकारण स्वच्छ तर निवडणूक रोख्यातील देणगीदारांची नावे का लपवली?

### राहुल गांधींचा मोदींवर हल्लाबोल



पुणे दि.३ (प्रतिनिधी)- निवडणूक रोख्यांमध्ये हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. सर्वोच्च न्यायालय म्हणते की, निवडणूक रोखे योजना बेकायदेशीर आहे, ती थांबवा आणि काय होतंय ते आम्हाला कळवा. आम्ही तारीख मागूनही आम्हाला दिली नाही. मोदीजी म्हणत होते राजकारण स्वच्छ करत आहे, तर तुम्ही देणगीदारांची नावे का लपवली? देणगीदारांची नावं बाहेर आल्यानंतर एक दिवस कळतं की एका कंपनीला हजारो कोटींचं कंत्राट मिळतं, त्यानंतर लगेचच ती कंपनी भाजपला पैसे देते. ईडी, सीबीआयची छापेमारी झाल्यानंतर लगेच त्या कंपनीकडून पैसे भाजपला जातात. मोदींनी निवडणूक रोख्यातून भ्रष्टाचार केल्याचा घणाघात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला.

पुण्यातील काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ राहुल गांधी यांची सभा झाली. या सभेतून राहुल गांधी भाजपवर सडकून प्रहार केला. ते म्हणाले की, ही संविधान वाचण्यासाठी लढाई आहे. लोकांना जे अधिकार संविधानामुळे मिळाले आहेत. संविधान बदलले तर देशातील २० ते २५ लोकांच्या हातात अधिकार जातील, असे ते म्हणाले. मोदींनी २२ उद्योगपतींचे १६ लाख रुपयांचे कर्ज माफ केल्याचे राहुल गांधी म्हणाले. एवढ्या पैशातून देशातील शेतकऱ्यांचे कर्ज २४ वर्षांसाठी माफ करता आले असते, मनरेगा २४ वर्षे या पैशातून चालवता आली असती, असेही त्यांनी सांगितले.

त्यांनी सांगितले की मोदींनी आरक्षणाची मर्यादा पन्नास टक्क्यांपेक्षा वाढवतील म्हणून असे जाहीर करावे. काँग्रेस सत्तेत आल्यावर आरक्षणाची मर्यादा आम्ही संपवून टाकू, ही मर्यादा कृत्रिम आहे. देशातील दलित, आदिवासी आणि मागासवर्गीय लोकांची एकत्रित संख्या ७३ टक्के आहे. मात्र, ते मागास आहेत. देशातील मिडीया या ७३ टक्क्यांचे प्रश्न मांडत नाहीत. हाय कोर्टाच्या ६५० न्यायाधिशांमधे १०० लोकही ७३ टक्के असलेल्या मागासवर्गीयांपैकी नाहीत. बजेटमधील पैसे खर्च करण्यावर मोजक्या लोकांचा अधिकार आहे. मात्र, मीडिया हे न दाखवता अंबानीच्या घरातील लग्न दाखवतात, अशी टीका त्यांनी केली.

## उद्धव ठाकरे सावरकरांचे नाव भाषणात घेणार का?; अमित शाहांचे आव्हान

रत्नागिरी दि.३ (प्रतिनिधी)- उद्धव ठाकरेंची व्होट बँकही काँग्रेसप्रमाणे झाली आहे. जे राहुल गांधी आणि शरद पवारांना शरण जातील, ते महाराष्ट्राचा गौरव सांभाळू शकणार नाहीत. उद्धव ठाकरे वीर सावरकरांचे नाव भाषणात घेण्याची हिंमत करू शकतात का? हिंमत नसेल तर तुम्ही नकली शिवसेना चालवत आहात, खरी शिवसेना शिंदेंकडेच आहे, या शब्दांत भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उद्धव ठाकरेंवर थेट हल्लाबोल करत आव्हान दिले.

अमित शाह महाराष्ट्रात असून, ठिकठिकाणी प्रचारसभा घेत आहेत. रत्नागिरी सिंधुदुर्गातून नारायण राणे यांना भाजपाने उमेदवारी दिली असून, नारायण राणे यांच्या प्रचारार्थ रॅलीत अमित शाह बोलत होते. ५ ऑगस्ट २०१९ रोजी नरेंद्र मोदीजींनी अनुच्छेद ३७० हटवले. काश्मीर कायमस्वरुपी भारतात आला. उद्धव ठाकरेंना विचारू इच्छितो की, तुम्ही मुख्यमंत्री बनण्यासाठी ज्यांच्या पायाशी पडलात ती काँग्रेस पार्टी आणि शरद पवार काय करत होते, अशी विचारणा अमित शाह यांनी केली.

राहुल गांधी संसदेत उभे राहिले आणि म्हणाले की, अनुच्छेद ३७० हटवू नका. त्यावर विचारले की, याचे कारण काय? त्यावर राहुल गांधी म्हणाले की, असे केल्यास काश्मीरमध्ये रक्ताची नदी वाहेल. मी तुम्हाला सांगतो की, गेल्या ५ वर्षांत तिथे रक्ताची नदी सोडा कोणाची विरोध करण्याची हिंमत झाली नाही. ही नरेंद्र मोदी सरकारची ताकद आहे. काश्मीरच्या लाल चौकात जाणे अवघड होते, तिथे कृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी केली जाते, असे अमित शाह यांनी सांगितले.

दरम्यान, उद्धव ठाकरेंना विचारू इच्छितो की, तुम्हाला मुख्यमंत्रिपद हवे आहे की, अनुच्छेद ३७० हटवणाऱ्याला विरोध करणारी काँग्रेस-राष्ट्रवादी पाहिजे. १० वर्षांत सोनिया गांधी-मनमोहन सिंग यांची सत्ता होती. पाकिस्तानी लोक देशात घुसत होते. मनमोहनसिंग मौन राखत दिल्लीत बसत होते. त्यांना व्होट बँकेची चिंता होती. नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांना खात्मा केला. पण काँग्रेसवाले याला फेक एन्काऊंटर म्हणतात. नरेंद्र मोदी यांनी ५ वर्षांत राम मंदिराची केस जिंकली आणि राम मंदिरही बांधून दाखवले, असे अमित शाह यांनी नमूद केले.

## उद्रेक होऊ देऊ नका, जास्त दिवस सहन करणार नाही; सुप्रिया सुळे

बारामती दि.३ (प्रतिनिधी)- माझ्या आणि रोहितच्या आईवर दोनवेळा बोलला ठीक आहे, तिसऱ्या वेळी बोलला, तर करारा जवाब मिलेगा असा इशारा राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिला आहे. बारामतीमध्ये महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुप्रिया सुळे यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला आहे.

सुप्रिया सुळे यावेळी बोलतांना म्हणाल्या, आमच्या घरातील गोष्टी रोज टीव्हीवर दिसतात, अनेक प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे आहेत पण देणार नाही. अनेक महिने झालं सहन करत आहे, आता जास्त दिवस सहन करणार नाही, उद्रेक होऊ देऊ नका. माझ्या आणि रोहितच्या आईवर दोनवेळा बोलला ठीक आहे, तिसऱ्या वेळी बोलला, तर करारा जवाब मिलेगा, असा रोखठोक इशारा सुप्रिया सुळेंनी (पान ४ वर)

## शिवसेना फोडल्याने बाळासाहेबांचा शाप मोदींना लागणार-विजय वडेट्टीवार

लातूर दि.३ (प्रतिनिधी)- बाळासाहेबांचा शाप मोदींना लागला आहे. ते सत्तेतून पाय उतार होणार अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. शिवसेना फोडल्यानंतर बाळासाहेब ठाकरेंना किती वेदना झाल्या असतील? असा खोचक सवालही त्यांनी केला आहे. पंतप्रधान मोदी यांच्या बाळासाहबांवरील विधानावरून वडेट्टीवारांनी निशाणा साधला आहे. लातूरमध्ये त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे.

यावेळी बोलतांना वडेट्टीवार म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींना आता पराजय दिसत आहे, त्यामुळे उद्या आपण सत्तेतून गेलो तर कोणीतरी आपणाला सांभाळणारे असले पाहिजे अशा विचाराने ते आता उद्धव ठाकरेंबद्दल जवळीकतेची भाषा करीत आहेत. शिवसेना फोडल्यानंतर बाळासाहेब ठाकरेंना किती वेदना झाल्या असतील? आणि म्हणूनच बाळासाहेबांचा शाप मोदीजींना लागला आहे. त्यामुळेच मोदी सत्तेतून पाय उतार होणार आहेत.



शिवाय बाळासाहेबांचे सुपुत्र सोडून दुसऱ्याला मुख्यमंत्री करणे ही कुठली नैतिकता आहे?, असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

पुढे बोलतांना वडेट्टीवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर हल्ला चढवला आहे, अजित पवार यांच्यावर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि तिसऱ्याच दिवशी त्यांना सोबत घेऊन भाजपने तिजोरीच्या चाव्या दिल्या. त्यामुळे अजित पवारांनी भाजप सुरक्षित आहे म्हणून भाजपमध्ये प्रवेश केला. असे भ्रष्टाचाराचे आरोप असलेली व्यक्ती तुम्हाला कशी चालते?. तसेच धर्मांध शक्ती सत्तेवर येऊ नयेत म्हणून, शरद पवार लढत आहेत याचा आम्हाला अभिमान आहे, (पान ४ वर)

## पतीने पत्नीशी अनैसर्गिक संबंध प्रस्थापित करणे बलात्कार नाही

### उच्च न्यायालयाचा निर्णय

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- पतीने पत्नीबरोबर अनैसर्गिक शरीरसंबंध निर्माण करणे किंवा त्यांच्यातील कोणत्याही लैंगिक संबंधांना बलात्कार मानता येणार नाही, असं मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. तसेच अशा प्रकरणांमध्ये पत्नीची संमती महत्त्वाची नाही असंही न्यायमूर्ती यांनी स्पष्ट केलं आहे. भारतात वैवाहिक बलात्कार (मॅरिटल रेप) गुन्हा मानला जात नाही असं सांगत उच्च न्यायालयाने हा निर्णय दिला. न्यायमूर्ती गुरपाल सिंह अहलूवालिया यांच्या खंडपीठाने म्हटलं आहे की, वैध विवाहानंतर पती-पत्नी एकत्र राहत असतील आणि पतीने त्याच्या १५ वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेल्या पत्नीबरोबर शरीर संबंध निर्माण केल्यास किंवा तिच्याबरोबर लैंगिक कृत्य केलं तर त्याला बलात्कार मानलं जात नाही. याला केवळ भारतीय दंड विधानातील कलम ३७६ ब हे अपवाद (पान ४ वर)

## उद्धव ठाकरे शत्रू नाहीत तर, त्यांचा पक्ष का फोडला?-जयंत पाटील

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- ''मोदींनी दहा वर्षात मुलाखत दिली नाही. आता निवडणुकीत महाराष्ट्र आपल्या हातातून गेला हे लक्षात आल्यावर मुलाखत देण्याची पाळी आली. यातच शरद पवार यांचा विजय आहे असे मला वाटत'', अशी टीका शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पीएम मोदींवर केली. यावेळी जयंत पाटील यांनी पीएम मोदींवर जोरदार हल्लाबोल केला.

जयंत पाटील म्हणाले, उद्धव ठाकरे शत्रू नाहीत तर, त्यांचा पक्ष का फोडला? बाळासाहेबांचं कर्ज जर हे उतरू शकत नव्हते, तर त्यांनी मग आधी बाळासाहेबांच्या चिरंजीवांशी चर्चा करायला हवी होती. त्यांचा पक्ष फोडून मग त्यांना सहानुभूती का दाखवत आहेत? असा सवालही जयंत पाटील यांनी केला.

पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, सर्व महाराष्ट्राची सहानुभूती ही उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पाठीशी आहे. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे जे वादळ महाराष्ट्रात सुरू झालं आहे. हे वादळ शांत करण्यासाठी दहा वर्षात पहिलीच मुलाखत नरेंद्र मोदी यांनी दिली असं मला वाटतं. उद्धव ठाकरेंसाठी खिडकी उघडी आहे, हा संभ्रम तयार करण्याचा त्यांचा संपूर्ण महाराष्ट्रात प्रयत्न आहे. पण .. उद्धव ठाकरे आणि आम्ही काल एकत्र होतो, आम्ही सगळे सोबत आहोत. मात्र जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचं हा त्याचा शेवटचा प्रयत्न आहे, असंही जयंत पाटील यांनी सांगितले.

## मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत तुमची भूमिका स्पष्ट करा

### मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला निर्देश

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- मराठा समाजास देण्यात आलेल्या कुणबी प्रमाणपत्रा विरोधात दाखल जनहित याचिकेवर उत्तर दाखल करा, असे आदेश हायकोर्टाने राज्य सरकारला दिले आहेत. मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबतची तुमची भूमिका स्पष्ट करा, असे न्यायालयाने म्हटले आहे. तर यासंदर्भात पुढील सुनावणी जून २७ पर्यंत स्थगित करण्यात आलेली आहे.

ओबीसी कल्याण संघटनेचे अध्यक्ष मंगेश ससाणे यांच्यामार्फत ही याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. तर या याचिकेला विरोध करणारे अर्जही हायकोर्टात दाखल झाले आहेत. मात्र, या अर्जांची प्रत अन्य पक्षकारांना अद्याप मिळालेली नाही. ही प्रत त्वरीत उपलब्ध करून दिले जावे, असे निर्देशही हायकोर्टाने आज दिले आहेत. (पान ४ वर)

## मोदींचे उफाळून आलेले प्रेम खोटे-संजय राऊत

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- मोदींनी खिडकी काय दरवाजा उघडला तरी आम्हाला काही फरक पडणार नाही असे विधान ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले आहे. मोदींचे उफाळून आलेले प्रेम खोटं आहे ते नकाश्रू आहेत अशी टीकाही त्यांनी केली. आज प्रसार माध्यमांशी बोलतांना त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे.

यावेळी बोलतांना संजय राऊत म्हणाले, नरेंद्र मोदी यांनीच महाराष्ट्रात आणि शिवसेनेत अडचणी निर्माण केल्या. मोदी यांचा बाळासाहेबांवर एवढं प्रेम असते



तर त्यांनी बाळासाहेबांची शिवसेना अशा प्रकारे फोडली नसती. मनुसती तोडली नाही तर बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे नावं एका बेईमान माणसाला देण्याचे कृत्य केले नसते, त्यांचा धनुष्यबाण हे चिन्ह एका बेईमान व्यक्तीच्या हातावर ठेवले नसते, अशी टीका राऊत यांनी केली.

पुढे राऊत म्हणाले, मोदींनी दरवाजे उघडले तरी काहीच फरक पडत नाहीत, आम्ही त्यासमोर उभं राहणार नाही. स्वाभिमान नावाची गोष्ट या महाराष्ट्रत अजून शिल्लक आहे. ते जर असे करत असतील तर याचा अर्थ एकच की मोदींना बहुमत मिळत नाहीये, त्यांचा पराभव होत आहे हे दिसंतय म्हणून ते अशा फटी, दरवाजे शोधत आहेत, असा हल्ला राऊत यांनी चढवला.

यावेळी संजय राऊत यांनी सांगलीतील काँग्रेसच्या नेत्यांवर अप्रत्यक्षरित्या हल्लाबोल केला. ''महाविकास (पान ४ वर)

## सुषमा अंधारे यांना घेण्यास आलेले हेलिकॉप्टर क्रॅश झाले; अंधारेंसह पायलट सुखरुप

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांना महाड येथे घेण्यास आलेले हेलिकॉप्टर क्रॅश झाल्याची माहिती समोर येत आहे. सुषमा अंधारे आणि पायलट दोघेही सुखरूप आहेत. अपघात झाला त्यावेळी सुषमा अंधारे हेलिकॉप्टरमध्ये नव्हत्या. केवळ पायलटच त्यामध्ये होता. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. दरम्यान, हेलिकॉप्टर क्रॅश होण्याचे कारण अद्याप समजले नाही.

या अपघातामध्ये हेलिकॉप्टरचे मोठे नुकसान झाले आहे. यासंबंधी सुषमा अंधारे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी आपण सर्वजण सुखरुप असल्याची पुष्टी केली. माझ्यासह पायलट, असिस्टंट तथा माझा लहान भाऊ विशाल गुप्ते आदी सर्वजण सुखरुप आहोत, असे त्या म्हणाल्या.

आज सकाळी ९.३० च्या सुमारास सुषमा अंधारे महाड येथून बारामतीकडे हेलिकॉप्टरने जाणार होत्या. त्यासाठी त्या हेलिपॅडवर आल्या होत्या. पण अचानक हेलिकॉप्टर हेलिपॅडवर उतरताना कोसळले. यामुळे सर्वांच्याच काळजाचा ठोका चुकला. (पान ४ वर)

## गद्दारांसाठी आमचे दरवाजे कायमचे बंद झाले-आदित्य ठाकरे

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- संविधानाविषयी पंतप्रधान मोदींच्या मनात किती द्वेष आहे. त्यांच्या मनात हा विखार जोपर्यंत आहे, तोपर्यंत त्यांच्याशी कोणतेही संबंध ठेवता येणार नाहीत असे म्हणत युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी भाजप शिवसेना एकत्र येण्याच्या चर्चा फेटाळल्या आहेत. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. तसेच गद्दारांसाठी आमचे दरवाजे कायमचे बंद झाले आहेत अशी टीकाही त्यांनी केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बाळासाहेब ठाकरे यांच्याबाबत केलेल्या विधानामुळे शिवसेना भाजप युतीच्या चर्चांना उधाण आले आहे. यावेळी आदित्य ठाकरे यांनी या चर्चेवर आपली स्पष्ट भूमिका मांडली.

ते म्हणाले, भाजपाने निवडणुकीत केलेला प्रचार आणि त्यांचे वर्तन सर्वजण पाहत आहत. लोकशाही, संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती त्यांच्या मनात किती द्वेष आहे, हेदेखील सर्वांना दिसत आहे. त्यांच्या मनात हा विखार जोपर्यंत आहे, तोपर्यंत त्यांच्याशी कोणतेही संबंध ठेवता येणार नाहीत, असे आदित्य यांनी स्पष्ट केले.

तसेच पुढे त्यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले, उद्या पेगाससससारखे एखादे (पान ४ वर)

## राहुल गांधींचा रायबरेलीतून उमेदवारी अर्ज दाखल

अमेठी दि.३ (वृत्तसंस्था)- राहुल गांधी यांनी रायबरेलीमधून उमेदवारी दाखल केली आहे. त्यांच्यासोबत सोनिया गांधी, बहीण प्रियांका गांधी, मेहुणे रॉबर्ट वाड्रा उपस्थित होते. किशोरीलाल शर्मा यांनीही अमेठीतून उमेदवारी दाखल केली आहे. उमेदवारी अर्जाच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसने रायबरेलीमधून राहुल आणि अमेठीतून किशोरी लाल यांच्या नावाची घोषणा केली. किशोरीलाल सोनिया गांधींचे विश्वासू मानले जातात. शुक्रवारी सकाळी नऊ वाजता राहुल आपल्या कुटुंबासह दिल्लीहून रायबरेलीला रवाना झाले. १०.३० वाजता अमेठी-रायबरेली सीमेवर असलेल्या फुरसातगंज विमानतळावर उतरले.

## पवनराजे हत्या प्रकरण फास्टट्रॅक कोर्टाकडे द्यावे; ओमराजे निंबाळकर यांची मागणी

धाराशिव दि.३ (प्रतिनिधी)- माझ्या वडिलांची हत्या राजकीय द्वेषापोटी केली, हे सत्य नाही का? मला वडिलांच्या हत्येचा सूड घ्यायचा आहे. मात्र, मी तो लोकशाही मार्गाने घेणार असल्याचे म्हणत धाराशिव लोकसभा मतदारसंघातील उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी पद्मसिंह पाटील यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांवर हल्ला चढवला आहे. इतकेच नाही तर केंद्रात अमित शहा आणि राज्यात देवेंद्र फडणवीस गृहमंत्री आहेत. त्यांनी पवनराजे हत्या प्रकरण फास्टट्रॅक कोर्टातकडे द्यावे आणि दोन महिन्यात निकाल लावावा, सर्व सत्य समोर आणावे, असे आवाहन देखील ओमराजे निंबाळकर यांनी केले आहे.

धाराशिव लोकसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे गटाच्या वतीने खासदार ओमराजे निंबाळकर यांना पुन्हा एकदा उमेदवारी देण्यात आली आहे. तर त्यांच्या विरोधात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अर्चना पाटील या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अर्चना पाटील या पद्मसिंह पाटील यांच्या सून आहेत. (पान ४ वर)

## उपासना आनंदी वृत्तीची

माणसाला आनंदी राहण्यासाठी काय किंमत मोजावी लागते. त्याही आधी प्रश्न पडतो आपण दु:खी का होतो? तर आपला अपेक्षा भंग होतो म्हणून. ठीक आहे अपेक्षा जर ठेवल्या नाही तर. तरीही आपण आहे त्या परिस्थितीत सुख मानत नाही. कारण आपण नेहमी स्वत:ची तुलना करतो दुसऱ्यांशी. त्यांच्याकडे खूप पैसा आहे, तो खूप हुशार आहे, ती खुप सुंदर आहे, मी का नाही. देवानी मला का नाही दिलं जे इतरांना दिलं. आपल्याकडे जे आहे ते बघून सुखी का नाही होत आपण. आपल्याजवळ काय आहे हे बघतच नाही.

म्हणतात, 'आनंद'च्या विरूद्ध शब्दच नाही. दु:ख हा सुखाच्या विरूद्ध आहे. म्हणजे, सुख आणि आनंद एकाच अर्थाचे नाहीत? काय फरक आहे दोघांमध्ये? सुख हा भौतिकतेशी संबंधित आहे. तर आनंद हा मनाशी, आत्म्याशी संबंधित आहे. आपल्याला भौतिक सुख मिळत नाही म्हणून आपण दु:खी होतो, शरीराला त्रास होतो म्हणून दु:खी होतो. का आनंद आपल्यापासून एवढ्या दूर पळाला? कारण आपण भौतिकतेत जास्त गुरफटलो. आपल्या मनाला आनंद देणाऱ्याच कृती केल्या तर शरीरालाही दु:ख होणार नाही, मनही आनंदी राहील. आपल्या आजच्या या भौतिकवादाला, उपभोगाला प्रगतीचं गोंडस नाव देवून मन:शांती हरवून बसलोय्, आनंदी वृत्ती हरवू बसलोय्. निसर्गनियमानुसार त्याला (निसर्गाला) त्याच काम करू द्या. आपण त्याच्याविरूद्ध न जाता त्याला सुसंगत वागलो तर काय हरकत आहे? आपल्या लोभी वृत्तीला लगाम लावला तर काय हरकत आहे? संत महात्मे सांगतात दानाचं महत्त्व, जेवढं आपण दान करू तेवढा लोभ आपल्यापासून दूर राहील.

कुठलीही गोष्ट आपल्याला गरज नसताना आपल्या जवळ ठेवली तर तो इतरांवर अन्याय होतो. प्रकृतीचा नियम आहे. जेवढी तुमची गरज तेवढंच घ्या नाहीतर ती विकृती ठरेल. आपल्याला हवं असलेलं, गरजेचं पण दुसऱ्याला त्याची गरज जास्त म्हणून ते आपण त्याला दिलं तर ती संस्कृती ठरते आणि आपली संस्कृती आपल्याला हेच शिकवते म्हणून का आपण दुसऱ्यांना लुबाडूही द्यायचं का? असा प्रश्न पडू शकतो, तर नाही. स्वत:ची गरज भागवून दुसऱ्यांना देण्यात ना त्याग आहे ना उपकार, तो प्रकृती नियम आहे. आजचे जे जगातील गर्भश्रीमंत लोक आहेत ते एका अर्थाने विकृतच आहे. जे ताकदवान आहेत त्यांना त्यांचं अधिपत्य हवंय. समस्त पृथ्वीवर त्यासाठी ते बेचैन आहेत आणि इतरांनाही करताहेत, ही निश्चितच विनाशकारी वृत्ती आहे. आपण स्वत:ला अशा वृत्तीपासून सावधच ठेवायला हवं. वेळीच खबरदारी घ्यायला हवी आणि त्याचा उत्तम उपाय म्हणजे आनंदी वृत्तीची जोपासना नव्हे उपासना.

## शरीराला ठेवी सुगंधी

उन्हाच्या झळा म्हणजे किती त्रासदायक, त्यातून शरीरातून पाझरणारा घाम आणि या घामाचा दुर्गंधी. जीव अगदी हैराण करून सोडतो. या घामापासून आणि दुर्गंधपासून संरक्षण व्हावं म्हणून हल्ली डिओ म्हणजे डिओड्रन्ट वापरले जातात. त्यामुळे काही प्रमाणात का होईना परफ्यूमची जागा डिओड्रंटने घेतली असं म्हणायला हरकत नाही. हे ड्रिओड्रंट वेगवेगळ्या प्रकारांत आणि सुगंधात येतात. त्यामुळे उन्हाळ्यात डिओड्रंट निवडताना कोणता डिओ उत्तम ठरेल या विषयी थोडक्यात.

डिओड्रन्टचं मुख्य काम असतं ते घामाची दुर्गंधी रोखणं. या डिओड्रंटना सुगंध नसतो ते फक्त दुर्गंधी रोखण्याचं काम करतात. त्यामुळे तुम्ही फक्त डिओड्रंट घेत असाल तर त्याला सुगंध नसेल ही गोष्ट लक्षात घ्या. डिओड्रंटमध्ये दुसरा प्रकार येतो तो अँटी पर्स्पिरंट, ज्याचं काम असतं शरीराला येणारा घाम रोखणं. त्यामुळे जर जास्त प्रमाणात घाम येत असेल तर अँटी पर्स्पिरंटचा पर्याय एकदम उत्तम आहे. डिओड्रंटना मिळणारी वाढती पसंती आणि एकाच प्रॉडक्टमध्ये अनेक फायदे देण्याच्या पद्धतीमुळे डिओमध्येसुद्धा तुम्हाला अनेक फायदे अनुभवायला मिळतील. उदाहरणार्थ, सध्या बाजारात आलेल्या डिओमध्ये तुम्हाला डिओड्रंट आणि अँटी पर्स्पिरंट या दोघांचे गुण आढळतील. घामाच्या दुर्गंधापासून सुटका आणि घाम रोखण्यासाठी डिओड्रंटचा वापर केला जातो. पूर्वीचं डिओड्रंट तुम्ही पाहिलं तर त्यांना पर्फ्यूम्ससारखा सुगंध अजिबात नव्हता. पण हल्ली पर्फ्यूमची जागा भरून काढण्यासाठी परफ्यूम्ड डिओही बाजारात आले आहेत. म्हणजे त्यांना परफ्यूमसारखाच सुगंध असतो. डिओड्रंटमध्ये आपल्या येथे प्रामुख्याने रोल ऑन आणि स्प्रे असे दोन प्रकार पाहायला मिळतात किंवा हे दोन प्रकार जास्त प्रसिद्ध आहे. त्यात स्त्रियांना रोल ऑन वापरण्याचा सल्ला जास्त देतात कारण रोल ऑन हे थेट त्वचेवर परिणाम करत असतात. त्यातले काही रोल स्किन टोन रिपेरिंगची भूमिका बजावत असतात. आणि हे रोल ऑन आकाराने छोटे असल्याने ते हँडबॅग्जमध्ये कॅरी करणं सोपं असतं.

काही जणांना डिओड्रंटच्या वापरामुळे त्रास होतो, त्वचेची जळजळ होते अशांनी डिओड्रंट घेताना काळजी घ्या. संवेदनशील त्वचेसाठी खास प्रकारचे डिओ तयार करण्यात आले आहेत त्यामुळे त्यांनी स्किन एक्सपर्टचा सल्ला घेऊन ते वापरू शकता. उन्हाळ्यात पर्फ्यूम डिओड्रंट वापरताना सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे योग्य तो सुगंध निवडा. या डिओचा सुगंध एखाद्याची डोकेदुखी बनण्यापेक्षा तीव्र सुगंधापेक्षा मंद सुगंधांच्या डिओंना पसंती द्या. यात तुम्ही मिनरल्स, मिंट, लेमन, लाइट फ्लोरल किंवा रिफ्रेशिंग फ्रूट असं मंद आणि मन ताजंतवानं ठेवणारे सुगंध घेऊ शकता. उन्हाळ्यात चॉकलेट, व्हॅनिला अशा तीव्र सुंगधांचे डिओ घेण्याचा विचार करू नका. नसती डोकदुखी ओढवून घ्याल.

# पुढच्यास ठेच; पण मागचा शहाणा झाला?

**अर्जदाराला** दिलेल्या कर्जापोटी त्याच्याकडून घेतलेली त्याच्या घराची मूळ कागदपत्रे नीट सांभाळून ठेवली नाहीत, म्हणून राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाने आयसीआयसीआय बँकेला जबर दंड ठोठावला आणि मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याने कर्जदारास बँकेने नवीन कागदपत्रे आपल्या खर्चाने बनवून द्यावीत असा आदेश दिला. हे कसे झाले त्याबद्दल एक लेख १५ सप्टेंबर, २०२३ रोजी याच 'प्रहार' दैनिकात तुम्ही वाचला असेलच. तशाच प्रकारचा आदेश देशातील सर्वात मोठ्या स्टेट बँकेला देण्याची वेळ राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगावर अलीकडे आली. नुकसानभरपाई म्हणून तब्बल रु.२५ लाख कर्जदाराला द्यावेत असा आदेश देताना राष्ट्रीय आयोगाने बँकेच्या हलगर्जीपणाचे वाभाडे काढले.

मूळ घटना घडली पश्चिम बंगालमधील मिदनापूर शहरात. एका व्यावसायिकाला अन्नावर प्रक्रिया करणारा छोटा प्रकल्प उभारायचा होता. खादी ग्रामोद्योग मंडळाने प्रायोजित केलेली आणि भारत सरकारने खासकरून लघू उद्योगांसाठी मंजूर केलेली एक विशिष्ट कर्ज योजना होती. ही योजना ठरावीक काळासाठी लागू होती. त्या अंतर्गत या व्यावसायिकाला हे कर्ज पाहिजे होते. बँकेने काही कागदपत्रे मागितली, तसेच कर्जाची सुरक्षितता म्हणून काही तारणही मागितले.

सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर बँकेने दोन हमीदार आवश्यक आहेत म्हणून सांगितले आणि त्यांच्या मालमत्तेची गहाणखते घेतली. मात्र सदर व्यावसायिकाने आवश्यक त्या सर्व गोष्टींची पूर्तता केल्यानंतर आणि सतत पाठपुरावा केल्यानंतरही बँकेने कर्ज वितरीत केले नाही व न देण्याचे कारणही सांगितले नाही. या सगळ्यात जवळजवळ तीन वर्षे गेली. यामुळे त्या व्यावसायिकाला खूप मनस्ताप झालाच, शिवाय प्रकल्प वेळेत सुरू करता न आल्याने आपले सुमारे अठ्ठ्याहत्तर लाखांचे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप त्याने बँकेवर केला. जेव्हा एखाद्या प्रकल्पासाठी बँक कर्ज देते तेव्हा ती तो प्रकल्प कितपत व्यवहार्य आहे त्याचे गुणांकन करून घेते. या प्रकल्पासाठी बँकेने हेच केले. गंमत म्हणजे या अठ्ठ्याहत्तर लाखांत बँकेच्या पॅनेलवर या कामासाठी नेमलेल्या एका चार्टर्ड अकाऊंटंटने अंदाजित केलेली सुमारे बहात्तर लाख रुपयांची संभाव्य व्यावसायिक मिळकत होती. सदर व्यावसायिकाने नुकसानभरपाईपोटी राज्य आयोगाकडे तक्रार दाखल केली.

स्टेट बँकेने कर्जाच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाहीच, शिवाय तब्बल तीन वर्षे कर्ज का वितरीत केले जात नाहीये तेही तक्रारदारास सांगितले नाही, ही सेवेतील त्रुटी आहे असे त्याने आयोगाच्या निदर्शनास आणले. तक्रारदाराची जी काही कागदपत्रे व गहाणखते बँकेने घेतली होती, ती परत केली नाहीतच, शिवाय आधी जेव्हा हे प्रकरण राज्य आयोगापुढे आले तेव्हा तिथेही ती सादर केली नाहीत, याची गंभीर दखल राज्य आयोगाने घेतली. ही ग्राहक सेवेतील अक्षम्य त्रुटी आहे असे नमूद करून राज्य आयोगाने बँकेला तक्रारदारास ५० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचाही आदेश दिला.

साहजिकच या निर्णयाविरोधात बँकेने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे अपील दाखल केले आणि 'कर्जाच्या अर्जावर प्रक्रिया न करणे ही सेवेतील त्रुटी होऊ शकत नाही' अशी भूमिका घेतली. राष्ट्रीय आयोगापुढे प्रतिवाद करताना तक्रारदाराच्या वकिलांनी निदर्शनास आणले की, बँकेकडून मूळ कागदपत्रे गहाळ झाली आहेत आणि तिच्या व्यवस्थापकांनी राज्य आयोगापुढे शपथेवर खोटी विधाने केली आहेत. कोणतीही बँक ही तिला सादर केल्या गेलेल्या कागदपत्रांची रक्षक (कस्टोडियन) असते आणि ती कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी बँकेवर असते. बँकेने राज्य आयोगापुढे खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले की, 'सगळी कागदपत्रे तक्रारदारास परत केली गेली, मात्र त्याबद्दल पावती घेतली नाही.'

समोर असलेले पुरावे आणि वस्तुस्थिती लक्षात घेऊन राष्ट्रीय आयोगाने बँकेने केलेल्या बचावात अनेक त्रुटी असल्याचे नमूद केले. एकीकडे 'कोणतेही मूळ कागदपत्र मिळाले नाहीत' असे बँक सांगते आणि दुसरीकडे तिचेच व्यवस्थापक 'सगळी कागदपत्रे तक्रारदारास परत केली' असे म्हणतात ही फार मोठी विसंगती आहे याची नोंदही आयोगाने घेतली. याशिवाय आयोगाने असे लक्षात आणून दिले की, या तक्रारदारास कर्ज तत्त्वत: मंजूर केले असल्याचे बँकेने कळवले; पण त्यानंतर सदर सरकारी कर्ज योजनेचा मर्यादित कालावधी लक्षात घेता पुढील सोपस्कार वेळेत पूर्ण करणे अपेक्षित होते, जे बँकेने केले नाहीत. त्यामुळे हा सगळा प्रकार म्हणजे सेवेतील त्रुटीच आहे असेच आयोगाने अधोरेखित केले. मात्र राज्य आयोगाने बँकेला जी रु. ५० लाख नुकसानभरपाई तक्रारदारास देण्याचा आदेश दिला होता, ती रक्कम अंतिम निर्णय देताना राष्ट्रीय आयोगाने रु. ५० लाखांवरून रु.२५ लाखांवर आणली; परंतु त्याचबरोबर बँकेस अशीही अट घातली की, ही नुकसानभरपाई बँकेने तक्रारदारास दोन महिन्यांच्या आत दिली पाहिजे; ती तशी दिली नाही, तर नुकसानभरपाईची रक्कम दुप्पट म्हणजे ५० लाख होईल. त्याच जोडीला राष्ट्रीय आयोगाने दंडापोटी बँकेने सदर रकमेवर द्यायच्या व्याजाचा दर १० टक्क्यांवरून १२ टक्क्यांवर नेला.

आयसीआयसीआय बँकेच्या उदाहरणावरून स्टेट बँकेने काही बोध घेतला नसावा; पण या प्रकरणावरून आपण सजग ग्राहक या नात्याने काहीतरी शिकायला हवे, नाही का? केवळ कर्ज घेण्यासाठी म्हणूनच नव्हे, तर इतरही बाबतीत आपण बँकेने सांगितल्यामुळे काही कागदपत्रे बँकेला देणार असू किंवा काही वस्तू तारण म्हणून ठेवणार असू, तर सर्व कागदपत्रांची एक प्रत आपल्याकडे असायला हवी. वस्तूंचा तपशील ठेवायला हवा. या गोष्टी बँकेकडे सुपूर्द करताना आपण हे सर्व का करत आहोत, त्याचे एक छोटेसे पत्र बँकेला द्यावे आणि या पत्राच्या प्रतीवर बँकेकडून सही शिक्क्यानिशी पोहोचपावती घ्यावी. म्हणजे भविष्यात कोणतीही तक्रार उद्भवली, तर पुरावा म्हणून आपल्याला ते दाखवता येईल.

**– अभय दातार**

# कामगारांना सुरक्षित वातावरण हवे

**देश** जागतिक पातळीवर विकासाच्या नवनवीन पायऱ्या पार करत असताना कामगारांची उत्तम साथ वेगळा वेग प्रदान करेल. या पार्श्वभूमीवर अलीकडच्या कामगार संहितेची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात येते. कामगार कायद्यांमधील सुयोग्य बदलामुळे सर्व स्तरांमधील आणि क्षेत्रांमधील कामगारांना सुरक्षित वातावरण प्रदान करण्याचा प्रयत्न आहे. कामगार दिन साजरा करताना ही लक्षवेधी बाब विचारात घ्यावी लागेल.



कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर कामगार संहितेबद्दल बोलणे आणि त्या आनुषंगाने बघायला मिळणाऱ्या वा अपेक्षित असणाऱ्या बदलांवर चर्चा करणे सयुक्तिक ठरेल. मुळात सुरुवातीपासून मोदी सरकारचे कामगारविषयक धोरण सुस्पष्ट आणि कामगार व मालक या दोन्ही वर्गांमधील दरी तसेच तणाव दूर करण्याचे राहिले आहे. २०१७-१८ पासूनच त्यांनी कामगार प्रश्नांविषयी ठाम धोरणे जाहीर केली. त्या अंतर्गत 'मेहनत को सन्मान, अधिकार एकसमान' या घोषवाक्यानुसार काम सुरू झाले.

या मेहनतीचा सन्मान करण्याच्या धोरणांतर्गत संघटित आणि असंघटित या दोन्ही वर्गातील कामगारांबरोबरच रोजंदारी कामगार, रस्त्यावरील विक्रेते आदींच्या हक्क आणि अधिकारांवरही गांभीर्याने विचार केला गेला. प्रामुख्याने कोव्हिडनंतरच्या काळात त्यांच्या लाभाचे नवनवीन प्रस्ताव मांडले गेले आणि त्यानुसार कायदे करून अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली. परिणामी, सर्व कामगारांना समान अधिकार या तत्त्वाची पाठराखण होताना आता पाहायला मिळत आहे.

पूर्वी कामगारविषयक धोरणे ठरवताना सरकारकडून पुढे येणाऱ्या योजना सरधोपट पद्धतीने आकारात यायच्या. त्यासाठी आधारभूत मानावी अशी कोणतीही ठोस आकडेवारी आपल्याकडे उपलब्ध नव्हती. उदाहरणार्थ, वेगवेगळ्या गटांमध्ये किती कामगार कार्यरत आहेत, संघटित तसेच असंघटित क्षेत्रात किती श्रमशक्ती आहे, रोजंदारी तत्त्वावर देशातील किती कामगार काम करतात, रस्त्यावरील विक्रेत्यांची संख्या किती आहे; या संबंधीची कोणतीही माहिती विश्वासार्ह पद्धतीने पुढे आली नव्हती. त्यामुळेच नंतरच्या काळात सरकारने कामगारविषयक धोरण ठरवताना स्पष्ट विचारांती पावले उचलली. त्यासाठी सर्वप्रथम त्या त्या क्षेत्राची सखोल माहिती, आकडेवारी जमा करण्याचे धोरण ठरले. त्यातून पुढे आलेली माहिती समोर ठेवूनच कामगारविषयक कायदे होतील, हेच त्यांचे सुरुवातीपासूनचे धोरण होते.

त्यानुसार सविस्तर अभ्यास करूनच २०२२-२३ मध्ये नवीन कामगार संहिता समोर आली. त्यामध्ये सरकारने किमान वेतनाची संकल्पना प्रत्यक्षात आणली आणि सार्वत्रिक केली. त्यामुळेच कामगारांना निर्धारित वेळेत किमान वेतन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळेच आता कोणत्याही क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना या नियमांचा मोठा फायदा मिळत असल्याचे दिसत आहे. आपण केलेल्या कष्टाचे, कामाचे पैसे वेळेत मिळाल्यास अनेक तक्रारी, अडचणी दूर होतात. हे लक्षात घेता आता वेळेत मोबदला मिळत असल्याचा लाभही कामगारवर्गाला मिळत आहे.

पूर्वी कामगारवर्गाला कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरणाची हमी नव्हती. काम करताना आपण सुरक्षित आहोत का, हा प्रश्न कायमच भेडसावत असायचा. मात्र नव्या कामगार कायद्यांमध्ये कामगारांच्या जीविताच्या सुरक्षेला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. साहजिकच यामुळे कार्यस्थळाचे वातावरण सुधारले आणि काम करणे सुरक्षित तसेच सुसह्य झाले. एकदा या दोन्ही गोष्टी हातात आल्या की, कोणत्याही उद्योग-व्यवसायाची वाढ आणि विकास सहजशक्य होतो. पुढे जाऊन सरकारने कामगारविषयक प्रश्नांवर सामाजिक सुरक्षेचा मुद्दाही चर्चेत घेतला. पूर्वी प्रॉव्हिडंट फंडाची संकल्पना होती.

आता सरकारने सोशल सेक्युरिटी फंडची संकल्पना मांडली.

ही संकल्पनाही कामगारांच्या आर्थिक हिताचे रक्षण करणारी आहे. उदाहरणार्थ, कोणत्याही कारणास्तव एखादा कामगार काम करू शकणार नसेल, तो अथवा ती दुसऱ्या क्षेत्रामध्ये कामाला लागले वा अकस्मात मृत्यूसारख्या घटना घडल्या, तर अशा कोणत्याही बदलाच्या काळात त्यांना सोशल सेक्युरिटी फंडाची मोठी मदत मिळते, वर उल्लेख केलेल्या कारणांमुळे येणारी अस्थिरता हाताळण्यास त्यांना आर्थिक हातभार मिळणे शक्य होते. त्यामुळे ही बाबही उल्लेखनीय म्हणायला हवी.

नवीन कामगार संहितेतील आणखी एक उत्तम बाब म्हणजे याने कामगारविषयक कायद्यांमधली क्लिष्टता कमी केली. पूर्वी कामगारविषयक तब्बल २९ कायदे होते. आता ते केवळ चार लेबर कोडमध्ये समाविष्ट करून घेतले गेले आहेत. या सगळ्यामागे कामगारांना कार्यस्थळी सुरक्षित आणि सुसह्य वातावरण देणे हाच विचार आहे. साहजिकच या नव्या आणि बदलत्या संकल्पनेत विकसित भारत, आत्मनिर्भर भारत, ईज ऑफ लिव्हिंग, ईज ऑफ डुईंग बिझनेस या सर्व धोरणांचा समावेश आहे. खेरीज मेहनतीचा सन्मान आणि समान अधिकार हे तत्त्व प्रत्यक्षात येण्यासाठी योग्य ती परिस्थिती निर्माण करण्यास पुढाकार घेतलेला आहे. थोडक्यात, सरकारने व्यक्त केलेल्या वरील ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्यात कामगारविषयक प्रश्नांची उकल महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसत आहे.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे या बदलत्या विचारांची आता कुठे ओळख झाली आहे. त्याच्या अंमलबजावणीला नुकतीच सुरुवात झाली आहे. स्वाभाविकच त्याचे परिणाम दिसण्यासाठी आपल्याला थोडी वाट पाहावी लागेल. हा कायदा जुलै २०२२ चा असल्यामुळे आता कुठे त्याला दोन वर्षांचा अवधी उलटला आहे. मात्र नजीकच्या भविष्यात निश्चितच त्याचे लाभ अनुभवता येतील. कार्यस्थळातील सुरक्षा व्यवस्था, किमान वेतन, वेतन वेळेत मिळण्याची खात्री, सामाजिक सुरक्षा आदी पातळ्यांवर नियम कडक केल्यामुळे कामगारांच्या जीवनशैलीत आणि आर्थिक स्थितीत चांगले पडसाद बघायला मिळतील, याची खात्री वाटते. महत्त्वाचे म्हणजे नियम आणि कायद्यांमधील ही स्पष्टता कामगार आणि मालकांमधील संबंध चांगले ठेवण्यास मदत करेल. पूर्वी या दोन वर्गांमधले संबंध असमान होते, तणावाचे होते.

मालकाचे कायमच वर्चस्व दिसून येत असे. कायद्यांमधील अस्पष्टतेचा फायदा या वर्गाला मिळायचा. मात्र अलीकडच्या बदलत्या कामगार कायद्यांमुळे या दोहोंमधील नात्यालाही वेगळे परिणाम लाभले आहे, वेगळी दिशा मिळाली आहे असे म्हणता येईल.

कामगार कल्याणाच्या अनेक योजनांमुळे परिस्थिती सुधारणा होताना दिसणार आहे. मुख्य म्हणजे कोणत्याही एका वर्गाचा विचार न करता कामगार आणि मालक या दोहोंचाही समान पातळीवर विचार केला गेल्यामुळे राबवण्यात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत असंतोष वा नाराजी असण्याची कारणे आता कमी होत आहेत. ही बाबही क्लिष्टता कमी होऊन परस्परांमधील संबंध सुधारण्यास कारणीभूत ठरेल.

कामगार संहितेमध्ये, कायद्यांमध्ये होणाऱ्या अशा सकारात्मक बदलांचा परिणाम कामगारांच्या कामावरही दिसून येईल. त्यांच्याकडून अधिक चोख, चांगले आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून काम होईल. खेरीज या बदलांकडे केवळ कामगार संहिता म्हणून पाहून चालणार नाही कारण याचाच एक एक पदर स्किल इंडिया, मेक इन इंडियामधील योजनांमध्ये दिसणार आहे. कौशल्य धारण केलेले आजचे अनेक कामगार पुढे उद्योजक होतील, स्वत:चे छोटे-मोठे व्यवसाय सुरू करतील. कामगार म्हणूनच कार्यरत राहणाऱ्यांना आपल्या सुखसुविधांमध्ये, आर्थिक प्रगतीमध्ये चांगले चित्र बघायला मिळेल. या सकारात्मक दृष्टिकोनातूनही आपण यंदाच्या कामगार दिनाकडे बघू शकतो.

भारतामध्ये प्रचंड श्रमशक्ती असल्याचे कायमच बोलले जाते. याच बळामुळे अनेक परदेशी आस्थापने आपल्याकडे गुंतवणूक करण्यास येत आहेत. लवकरच इलॉन मस्क यांची 'टेस्ला' भारतात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या पातळीवरही आपल्याकडील कामगार कायद्यांमधील सुधारणा महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतील. कामगार कायदे योग्य नसल्यास परकीय गुंतवणूकदारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. परिणामी, येणारी गुंतवणूक आणि त्यायोगे होणाऱ्या विकासाला खीळ बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र कामगारविषयक धोरणांमधील सुयोग्य बदल ही भीतीही दूर करतील.

**– आशय अभ्यंकर,**
प्रख्यात अभ्यासक

# लस बनवणाऱ्या कंपनीने कोर्टात दिली कोरोना लसीचे शरीरावर दुष्परिणाम होत असल्याची कबूली!

नवी दिल्ली, दि. ३ (प्रतिनिधी) - कोरोना काळामध्ये जगभरातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरलेल्या कोरोना लस निर्मिती करणा-या कंपनीने या लसीचे शरीरावर दुष्पपरिणाम होत असल्याची कबूली ब्रिटनच्या कोर्टात दिली आहे. कोरोना लस बनवणारी कंपनी एस्ट्रझेनेकाने कोर्टात सांगितले की, त्यांच्या कोरोना लसीमुळे टीटीएस म्हणजे थ्रोम्बोसईटोपेनिया सिंड्रोम म्हणजे शरीरात रक्ताच्या गाठी निर्माण करण्यास कारणीभूत ठरणारे दुष्पपरिणाम होऊ शकतात. ज्यामुळे व्यक्तीला स्ट्रोक येणे, हृदय बंद पडणे, यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात.

या कंपनीची कोविशील्ड नावाची कोरोना लस भारतातल्या नागरिकांना दिली गेली आहे. त्यामुळे भारतासाठी देखील ही अतिशय चिंताजनक बाब आहे. भारतीय कंपनी सीरम इन्स्टीट्युट ऑफ इंडिया आणि एस्ट्रझेनेकाने एकत्र येत भारतात कोरोना लसीची निर्मिती केली होती. त्याचा वापर केवळ भारतातच नाही तर अनेक देशांमध्ये निर्यात केली गेली. काही ठिकाणी या लसीला व्हॅक्सजेवरिया म्हणून देखील ओळखले गेले.

ब्रिटनमध्ये जेमी स्कॉट नावाच्या एका व्यक्तीने या कंपनीवर खटला दाखल केला आहे. त्याचे म्हणणे आहे की, ही लस घेतल्यानंतर तो ब्रेन डॅमेजच्या समस्येला सामोरा गेला आहे. तसेच अनेक कुटुंबांनी याबद्दल तक्रार केली आहे. तसेच त्यांनी कंपनीकडे नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. त्यामुळे ब्रिटनने या लसीवर बंदी घातली आहे. दरम्यान भारतात देखील असे मृत्यू वाढले आहेत. त्यामुळे भारतात देखील कंपनीकडे नुकसान भरपाई देण्याची मागणी केली जाऊ शकते.

## नवीन धोका वाढल्याचा जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) - कोरोना संकटाच्या काळात डॉक्टरांकडून प्रतिजैविकांचा अतिवापर केल्याचे 'साईड इफेक्ट्स' आता समोर आले असून त्यामुळे नवीन धोका वाढल्याचा गंभीर इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. अनेक रुग्णांना आवश्यक नसतानाही प्रतिजैविके देण्यात आली. जगभरात सरासरी चारपैकी तीन रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. यामुळे आता प्रतिजैविक प्रतिरोधाची समस्या जगभरात जाणवू लागली आहे, अशी धक्कादायक माहिती जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या पाहणीत उघडकीस आली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने ६५ देशांतील रुग्णालयांमध्ये दाखल झालेल्या ४ लाख ५० हजार कोरोना रुग्णांच्या आरोग्य अहवालाची तपासणी केली. हे रुग्ण जानेवारी २०२० ते मार्च २०२३ या कालावधीतील आहेत. यासंदर्भात जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे की, कोरोना संकटाच्या काळात रुग्णालयात दाखल झालेल्या केवळ ८ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्याची गरज होती. प्रत्यक्षात डॉक्टरांकडून जगभरात सरासरी ७५ टक्के रुग्णांना सरसकट प्रतिजैविके देण्यात आली. पश्चिम प्रशांत विभागात ३३ टक्के रुग्णांना तर आखाती आणि आफ्रिकी देशांमध्ये ८३ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. युरोप आणि अमेरिकेत २०२० ते २०२२ या कालावधीत प्रतिजैविके देण्याचे प्रमाण हळूहळू कमी झाले. मात्र, आफ्रिकेत ते वाढताना दिसून आले.

प्रतिजैविकांचा सर्वाधिक वापर कोरोनामुळे गंभीर स्थिती झालेल्या रुग्णांमध्ये झाला. जगभरात अशा ८१ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. मध्यम अथवा सौम्य त्रास असलेल्या करोना रुग्णांना प्रतिजैविके देण्याचे प्रमाण विभागनिहाय वेगळे असून, त्यात आफ्रिकेत सर्वाधिक ७९ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. विशेष म्हणजे, प्रतिजैविके देण्यात आल्याने कोरोना रुग्णांच्या प्रकृतीत त्यावेळी फरक पडला नाही. अनेक रुग्णांमध्ये प्रतिजैविक प्रतिरोधाची समस्या निर्माण झाली आहे. जीवाणूसंसर्ग नसलेल्या रुग्णांच्या आरोग्याला त्यामुळे अपाय झाला, असे संघटनेने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

एखाद्या रुग्णाला प्रतिजैविके देण्याची गरज असते त्यावेळी जोखमीपेक्षा फायदा अधिक असल्याचे तपासले जाते. मात्र, गरज नसताना रुग्णाला प्रतिजैविक दिल्यास कोणताही फायदा होत नाही. उलट रुग्णामध्ये प्रतिजैविक प्रतिरोध निर्माण होतो, असे जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिजैविक प्रतिरोध विभागाचे प्रमुख डॉ. सिल्व्हिया बर्टानोलियो यांनी म्हटले आहे.

**प्रतिजैविक प्रतिरोध म्हणजे काय?**

एखाद्या व्यक्तीला जीवाणू आणि बुरशी संसर्ग झाल्यानंतर त्यावरील उपचार म्हणून प्रतिजैविक औषधे दिली जातात. परंतु प्रतिजैविकांचा अतिवापर झाल्यास त्या व्यक्तीच्या शरीरात त्यासाठी प्रतिरोध निर्माण होतो. त्यामुळे जीवाणू आणि बुरशी प्रतिजैविकांना दाद देत नाहीत. यामुळे अशा व्यक्तीला संसर्ग झाल्यानंतर त्याच्यावर उपचार करणे अवघड बनते. त्यातून संसर्ग झालेली व्यक्ती गंभीर आजारी पडण्यासोबत तिचा मृत्यूही होऊ शकतो.

# जैन धरोवर दिवस संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - जैन समाजातील प्रेरणास्थान राहिलेले स्व. निर्मलकुमार सेठी, दिल्ली, व स्व. पी.यु. जैन यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्री भारतवर्षीय दिगंबर जैन महासभा, तीर्थ संरक्षिणी महासभा, श्री उत्तमचंद ठोळे छात्रालय, पी.यु. विद्यालयच्या संयुक्त विद्यमाने जैन धरोहर दिवस साजरा करण्यात आला. शाळेतील शिक्षिका शर्मिला जैन आणि संचानी मंगला चरण प्रस्तुत केले. तीर्थ संरक्षिणी महासभा महाराष्ट्र प्रांतचे अध्यक्ष वर्धमान पांडे यांनी प्रास्ताविक केले. जैन शिक्षण संस्था अध्यक्ष महावीर सेठी यांनी स्वागतपर भाषण केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष न्यायमूर्ती के. यु.चांदीवाल व प्रमुख पाहुणे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग औरंगाबाद सर्कलचे अधीक्षक डॉ. शिवकुमार भगत यांचे हस्ते दीप प्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले. स्व.पी. यु.जैन आणि निर्मल सेठी यांच्या फोटोस माल्यार्पण व पुष्पांजली करण्यात आली,

सकल जैन तसमाजाचे उपाध्यक्ष डी. बी. कासलीवाल यांनी निर्मलजी सेठी यांचे तर अरुण पाटणी यांनी पी यू जैन यांचे जीवन चरित्र समाजासाठी कसे प्रेरक आहे हे प्रतीपादित केले. प्रमुख अतिथी डॉ शिवकुमार भगत यांनी जैन पुरातत्त्व व त्याचे संरक्षण व संवर्धन करणे या बद्धल उद्बोधन केले. न्यायमूर्ती के.यु. चांदीवाल यांनी अध्यक्षीय समारोप केला ,

याप्रसंगी तीर्थक्षेत्र कमेटी मुबईचे नवनिर्वाचित राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय पापडीवाल यांचा विविध संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास खं.दि. जैन समाजाचे अध्यक्ष ललित पाटणी, महासभेचे अध्यक्ष डी.यु. जैन, कार्याध्यक्ष देवेंद्र काला, सकल जैन समाजाचे महामंत्री महावीर पाटणी, प्रकाश कासलीवाल, दिनेश गंगवाल, सुरेश कासलीवाल आदी अनेक मान्यवरांची व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तीर्थ संरक्षिणी महासभेचे महामंत्री महावीर ठोळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन महासभेचे महामंत्री अनुप पाटणी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पी यु जैन माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक विजय पाटोदी, छात्रालयाचे अध्यक्ष संदीप ठोळे, अजय पहाडे व शाळेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले. अशी माहिती प्रचार प्रसार प्रमुख नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल यांनी दिली.

# कोविडची पहिली लस बनवणाऱ्या शास्त्रज्ञावर भ्रष्टाचाराचे आरोप

## चीनच्या सरकारने केले निलंबित

बिजिंग, दि. ३ (वृत्तसंस्था) - चीनच्या पहिल्या कोविड — १९ वरील लस निर्मिती करणाऱ्या टीमचे नेतृत्व करणाऱ्या चीनमधील सर्वात मोठ्या लस निर्मात्या कंपनीतील वरिष्ठ शास्त्रज्ञ यांग शिओमिंग यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून राष्ट्रीय विधानमंडळाच्या उपपदावरून निलंबित करण्यात आले आहे. चीनच्या नॅशनल पीपल्स काँग्रेसने (एनपीसी) शुक्रवारी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, यांग यांच्यावर 'शिस्त आणि कायद्याचे गंभीर उल्लंघन' केल्याचा आरोप आहे.



स्थायी समितीच्या चार दिवसांच्या बैठकीनंतर झालेल्या एनपीसीच्या विधानात सूचित केले होते की, यांगची आधीच पक्ष शिस्तपालन संस्था — केंद्रीय शिस्त तपासणी आयोगाकडून चौकशी केली जात आहे. मागच्या काही वर्षांपासून राष्ट्रपती शी जिनपिंग यांनी देशात भ्रष्टाचारविरोधी मोहीम हाती घेतली आहे. यांग यांची बरखास्ती ही भ्रष्टाचारविरोधी अभियानाचा एक भाग असल्याचं बोललं जात आहे. चीनमधील आरोग्य यंत्रणेतील ही सर्वात मोठी कारवाई समजली जातेय.

यांग हे एक अनुभवी शास्त्रज्ञ आहेत. त्यांनी सीएनबीजीमध्ये लस बनवणाऱ्या टीमचं नेतृत्व केलं होतं. या टीमनेच सिनोफार्मा बीबीआयबीपी-कोरवी व्हॅक्सिन बनवली होती. चीनची ही पहिली कोरोना व्हॅक्सिन होती. चीनच्या या पहिल्या लशीला सार्वजनिक उपयोगाकरीता मान्यता देण्यात आलेली होती. विशेष बाब म्हणजे यांग शिओमिंग यांना सप्टेंबर २०२० मध्ये त्यांच्या कार्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आलेला होता.

# माणूसपणाची खूण मायभाषा

**माणूस** अनेक बाबतीत इतर प्राण्यांपेक्षा अनेक गोष्टींत वेगळा ठरतो. याविषयीचे कितीतरी मुद्दे समोर ठेवता येतील. त्यातला कुठला मुद्दा महत्त्वाचा?मला नेहमी वाटतं माणसाला भाषेचे वरदान असणे, त्याआधारे त्याने व्यक्त केलेले विचार, त्यांच्या आदान- प्रदानाकरता निर्माण केलेली 'पुस्तक' नावाची गोष्ट हा माणसाचा सर्वात महान शोध आहे. हे अधोरेखित करण्याचे निमित्त म्हणजे या महिन्यातील जागतिक पुस्तक दिन! नुकताच २३ एप्रिल हा दिवस पुस्तक दिन म्हणून जगात साजरा झाला.जगात अनेक भाषांमध्ये, विविध साहित्य प्रकारांमध्ये असंख्य पुस्तके लिहिली जातात. आपले कुतूहल शमवणारी, आपली जिज्ञासा जिवंत ठेवणारी, प्रश्नांची उत्तरे देणारी आणि प्रश्न उपस्थित करणारी, आपल्या जगण्याचा अवकाश भारून टाकणारी!

संस्कृतीच्या कितीतरी धाग्यांशी बांधून ठेवणारी, पण वाचनाचा संस्कार आपल्याकडे किती रुजला आहे, असा प्रश्न पडतो. संगणक आल्यानंतर माहितीचा प्रचंड भडीमार आपल्यावर होऊ लागला. या भडीमारात ज्ञानाची लालसा हरवून गेली. कवी गुलजार यांची पुस्तकांविषयीची सुंदर कविता माझ्या वाचनात आली, या कवितेचा आशय काहीसा असा आहे; पुस्तके, जी डोकावतात, बंद कपाटाच्या काचांतून. मोठ्याउत्सुकतेने पाहतात. आता महिनोन् महिने पुस्तकांशी भेट होत नाही.

जी संध्याकाळ त्यांच्यासोबत जायची, ती आता संपते संगणकाच्या पडद्यासोबतष्ठ पुस्तके अस्वस्थ झाली आहेत जी नाती दाखवायची, ती नाती विस्कटली आहेत. कितीतरी शब्दांचे अर्थ गळून पडले आहेत. सुकून काष्ठ झालेत शब्दष्ठ एकूणच संवेदनाशून्य झालेला भोवताल आज पुस्तकांना निर्जीव करण्याच्या तयारीत आहे. पुस्तके खरंतर आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणाची साक्षीदार बनू शकतात. अर्थात त्यांना आपण आपल्या आयुष्यात सामावून घेतले तरच! मला पुस्तकदिनालाच एक संदेश आला, 'हे शतक कदाचित पुस्तकांशी मैत्री करण्याचे शेवटचे शतक असेल'. वाचून मन अस्वस्थ झाले.

एक मनात कोरला गेलेला क्षण आठवला. एका इमारतीसमोरचा कट्टा नि त्या कट्ट्यावर बसलेली मुले. ही सर्व कुमारवयीन मुले होती. या मुलांपैकी प्रत्येकाच्या हाती मोबाइल होते नि सर्व मुले आपापल्या मोबाइलमध्ये डोके खुपसून बसली होती. माणसांवर पुस्तकांनी गारूड करायचे दिवस संपलेत का? जपानचे एक वैशिष्ट्य मी ऐकले आहे.

जपानमध्ये माणसे बस, ट्रेन, शॉपिंग मॉल कुठेही वाट पाहत असली की सहजगत्या आपल्याकडचे पुस्तक काढतात नि वाचण्यात रमून जातात. पुस्तकांचे महत्त्व या लोकांनी किती अचूक जाणले आहे.पुस्तके आपल्या आयुष्यात असणे ही माणूसपणाची खूण आहे.

**- डॉ. वीणा सानेकर**

# वैजापूर : श्री स्वामी समर्थ केंद्रात चंडीका यागसाठी महिलांचा प्रचंड उत्साह



वैजापूर, दि. ३ (प्रतिनिधी) - माजी आमदार स्व.आर.एम. वाणी यांनी स्थापन केलेल्या येथील श्री. स्वामी समर्थ केंद्रात श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त आठ दिवस विविध 'याग' कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत,याचा एक भाग म्हणून शुक्रवार(ता.०३) रोजी) केंद्रात चंडिका याग साठी महिलांनी एकच गर्दी केली.

या साठी १०९ महिलांनी सहभाग नोंदविला. सौ. अनिता राजपूत व प्रतीक्षा मोकळ यांनी या निमित्त वाचन केले तर मोनिका त्रिभुवन यांनी सहभाग नोंदविला. या प्रसंगी माजी नगरसेवक लिमेश वाणी, सी.के. पवार, श्रीमती सुमनबाई आलूले, जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, अरविंद तुपे, शिल्पा तुपे, शैलेश चव्हाण, सौ. उषा रावसाहेब निखाडे सहकार्य करीत आहेत.

# 'झपाटलेला ३' मध्ये लक्ष्मीकांत बेर्डे अवतरणार! कशी साधणार ही किमया?

## २०२५ मध्ये सिनेमा येणार प्रेक्षकांच्या भेटीला

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) - 'ओम फट् स्वाहा' म्हटलं की मराठी प्रेक्षकांना हमखास तात्या विंचू आठवतो. पाश्चात्त्य सण हॅलोवीन साजरा करतानाही तात्या विंचू कायम चर्चेत येतो हे 'झपाटलेला' चित्रपटाचं यश आहे. प्रसिद्ध मराठी अभिनेते व दिग्दर्शक महेश कोठारे यांनी दिग्दर्शित केलेल्या 'झपाटलेला' सिनेमाची जादू ३० वर्षांनंतर आजही कायम आहे. यातील दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांनी साकारलेला लक्ष्याही चांगलाच लक्षात राहिला.




सिनेमाचा दुसरा भाग 'झपाटलेला २' देखील प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. यात महेश कोठारे यांचा मुलगा आदिनाथ कोठारे लक्ष्याच्या मुलाच्या भूमिकेत दिसला होता. या चित्रपटालाही प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. मात्र चित्रपट पाहताना कायम लक्ष्याची उणीव भासत होती. यानंतर आता चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची तयारी सुरु करण्यात आली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे या भागात प्रेक्षकांना लक्ष्याची उणीव भासणार नाही, कारण लक्ष्मीकांत बेर्डे पडद्यावर अवतरणार आहेत. आजच्या काळात सगळं काही सहज शक्य करणाऱ्या एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने ही किमया साधली जाणार आहे.

'झपाटलेला ३' हा चित्रपट तांत्रिकदृष्ट्या भक्कम असणार आहे. चित्रपटाच्या अनुषंगाने काही तांत्रिक गोष्टींसाठी आपण ऑस्ट्रेलियाला जाणार असल्याचे महेश कोठारे यांनी काही दिवसांपूर्वी शिर्डीत पत्रकारांशी बोलताना सांगितले. 'झपाटलेला २' मध्ये 3D तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला होता.

हा मराठीतील पहिला 3D चित्रपट ठरला होता. यानंतर आता एआयच्या मदतीने दिवंगत अभिनेत्याला पडद्यावर आणणारा देखील 'झपाटलेला ३' हा मराठीतील पहिला चित्रपट ठरु शकतो.

# मुलांच्या भावविश्वाशी एक रूप होणारा कविता संग्रह 'ए...आई'

**लहान** मुलं-मुलींच विश्व म्हणजे आई आणि फक्त आईच होय, मुलं-मुलींना काही विचारायचं तर सुरुवात ए....आई नेच होते. हे जाणलं आई मनाच्या कवयित्री निशा कापडे-निकम यांनी आणि त्यांनी शब्दांनी गुंफल्या२८बाल कविता आपल्या 'ए....आई' बाल काव्य संग्रहात,सौ,निशा महेश कापडे-निकम यांच्या या बालकाव्य संग्रहात प्रत्येक कविते मध्ये एक समान धागा आढळतो तो म्हणजे आई आणि मुलांचा हृद्य संवाद ,या काव्य संग्रहात पहिली कविता आहे ,'भोपळा'या कवितेत मुलं आपल्या आईला विचारते 'ए...आई' 'पळ रे भोपळ्या टूणुक, टूणुक गोष्टच कोणी सांगत नाही' ही खंत मुलं आपल्या आई जवळ व्यक्त करते, पाऊस या कवितेतून कवयित्री लिहिते की.




**'ए आई बघ ना कसा पाऊस रिमझिम पडतो**
**पावसामध्ये भिजायला मुलांना का ग बोलावतो'**

सहज व सोप्या शब्दात मांडलेली ही रचना मुलांच्या मनांना सहज भावणारी आहे, कवयित्री निशा कापडे यांनी बाल अत्यंत जवळून न्याहळलेली आहेत, भावा बहिणीची चिडवा चिडवी बाबत कवयित्री 'दादा अन ताई' या कवितेत लिहिते,

**ए आई दादा बघ**
**कसा मला चिडवितो**
**सारखा मित्रांसमोर हा**
माझी फजिती करतो' हे मुलांच्या मनातील भाव आपल्या शब्दात वर्णन करणारी कवयित्री बाल मनाची सखोल अभ्यासक वाटते, कवयित्री 'टाहो' या कवितेत पोटातील बाळाची इच्छा व्यक्त करतांना लिहिते

**'ए....आई ऐक ना**
**मला जग बघू दे ना**
**जन्मा आधीच मला**
**मारून नको टाकू ना'**

बाळाच्या अंतर मनाची हाक अत्यंत भावुक पद्धतीने लिहून भ्रूणहत्या बाबत ही जागृतीचे भान ठेवले आहे. चांदोबा, फुलपाखरू, कावळ्यांची शाळा, टॉम आणि जेरी, भातुकली, ससोबा अशा कवितांतून ही कवयित्री निशा कापडे यांनी मुलांच्या मनाचा ठाव घेत या कविता शब्दातून गुंफल्या आहेत. यातील सर्व कविता मुलांना व मुलींना आपल्या वाटतील व ते मोठ्या आवडीने या कवितां वाचतीक असे वाटते.

कविता संग्रह नाव- ए...आई
कवयित्री- सौ. निशा महेश कापडे-निकम
मूल्य- ८०/-
समीक्षक- धोंडीरामसिंह ध राजपूत, वैजापूर

# अग्रवाल युवा मंचच्या अध्यक्षपदी मुकेश अग्रवाल तर सचिवपदी प्रसाद अग्रवाल यांची निवड



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - २०२४-२५ या कालावधीसाठी अग्रवाल युवा मंचच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. मुकेश अग्रवाल यांची अध्यक्षपदी, प्रसाद अग्रवाल यांची सचिवपदी आणि आशिष भारुका यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. श्लोक बगडिया आणि नरेश धानुका यांनी सहसचिवांची पदे भरली. कोषाध्यक्षपदाची जबाबदारी केतन धननावत यांच्याकडे सोपवण्यात आली होती.

याव्यतिरिक्त, जनसंपर्क अधिकारी (PRO) पदे आशिष मोर, चिन्मय गोयल, प्रशांत अग्रवाल, प्रथमेश भारुका आणि सागर अग्रवाल यांनी भरली आहेत. नवनिर्वाचित अध्यक्ष मुकेश अग्रवाल यांनी नव्या जबाबदाऱ्यांबाबत आपले मनोगत व्यक्त करताना आगामी कार्यकाळाचे महत्त्व विशद केले. समृद्ध भविष्यासाठी तरुणांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रकल्पांवर लक्ष केंद्रित केले जाईल, असे त्यांनी नमूद केले. नवनिर्वाचित मंडळाने संस्थेला नवीन दृष्टीकोन आणि उपक्रम आणणे अपेक्षित आहे, युवा विकास आणि समुदाय कल्याणासाठी आपली वचनबद्धता पुढे नेणे.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# महिला, दिव्यांग आणि युवा अधिकारी कर्मचारी सांभाळणार ३७ मतदान केंद्र

## 'संवाद सेतू' उपक्रमात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली माहिती

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- उमेदवारांची यादी अंतिम झाल्यानंतर आता प्रशासन मतदान प्रक्रियेसाठी पूर्वतयारी करीत आहे. या प्रक्रियेत महिला कर्मचारी १६, दिव्यांग कर्मचारी १० तर युवा अधिकारी कर्मचारी ११ असे एकूण ३७ मतदान केंद्र संपूर्णपणे सांभाळणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज 'संवाद सेतू' या उपक्रमात दिली.

माध्यमे व प्रशासन यांच्यात संवाद साधून निवडणूक विषयक माहितीचे आदानप्रदान व्हावे या हेतूने संवाद सेतू हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास तसेच माध्यम प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

उमेदवारांची यादी अंतिम झाल्यानंतर आता प्रशासन मतदान प्रक्रियेसाठी सज्ज होत आहे. मतदान केंद्रांवर द्यावयाच्या विविध सुविधांचा आढावा घेण्यात येत आहे. जिल्ह्यात महिला, दिव्यांग व युवा अधिकारी कर्मचारी संपूर्णपणे मतदान केंद्र सांभाळणार आहेत. त्यात महिला अधिकारी-कर्मचारी १६,दिव्यांग अधिकारी कर्मचारी १०, युवा अधिकारी कर्मचारी ११ असे एकूण ३७ मतदान केंद्र संपूर्णपणे याच अधिकारी



कर्मचाऱ्यांकडून संचलित होतील. यासोबतच पर्यावरण पूरक मतदान केंद्र तयार करण्याचेही प्रशासनाचे नियोजन सुरु आहे.प्रत्येक मतदान केंद्रावर कचरा कुंडी देण्यात येणार आहे.

मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी घरोघरी जाऊन मतदारांना आवाहन करण्यात येणार आहे, 'चला चला मतदानाला', हा उपक्रम त्यासाठी राबविण्यात येणार आहे. मतदान केंद्र तसेच मतदानाबाबत सार्वजनिक उद्घोषणा व्यवस्थेचा वापर करुन लोकांपर्यंत माहिती पोहोचविण्यात येणार आहे. जिल्ह्यात सर्वात कमी मतदान झालेल्या मतदान केंद्रांचा अहवाल दि.६ पर्यंत मागविण्यात आला आहे. मतदानाविषयी उत्सूकता निर्माण व्हावी यासाठी मतदान केंद्र स्थापनेबाबत गाजावाजा करावा, जेणेकरुन लोकांना कळावे. त्यांना मतदान केंद्रांवरील सुविधांबाबत माहिती देण्यात यावी. मतदान केंद्र हे गावापासून दूर अथवा जवळ असे कोठे असेल त्यानुसार लोकांना मतदान केंद्राबाबत माहिती पोहोचवावी,असे निर्देश यंत्रणेला देण्यात आले आहे. याशिवाय मतदार सहायता केंद्र, मतदान चिठ्ठ्यांचे वाटप इ. बाबत काम सुरु आहे,असे त्यांनी सांगितले.

उमेदवारांची संख्या वाढल्याने ४८९८ मतदान यंत्रे जादा लागणार आहेत. ते दाखल झाले असून त्यांचे प्रथम स्तरीय तपासणीसाठी १२ इंजिनिअर्स दाखल झाले असून आज अखेर हे काम पूर्ण होईल असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.आचारसंहिता भंग वा निवडणूक अनुषंगाने घडणाऱ्या घटनांच्या बाबत गुप्तचर विभागामार्फत सर्व हालचालींवर नजर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत,असेही त्यांनी सांगितले.

# अक्षय तृतीयेचा मुहूर्त : 'बालविवाह' रोखण्यासाठी शासकीय यंत्रणा सतर्क

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- मे महिन्यात दि.१० रोजी 'अक्षय तृतीया' या मुहूर्तावर अनेक विवाह होत असतात. त्यात बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि,बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील शासकीय यंत्रणांना सतर्क राहण्याचे सुचित करण्यात आले आहे, तसेच नागरिकांनाही अशा विवाहाची माहिती गोपनियरित्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**वर्षभरात रोखले ७५ बालविवाह**

जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा कृती दलाची स्थापना करण्यात आली असून बालविवाह निर्मूलन कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. गेल्या वर्षभरात (दि.१ एप्रिल २०२३ पासून) जिल्ह्यात आतापर्यंत ७५ बालविवाह रोखण्यात कृती दलाला यश आले आहे. त्यातील तीन प्रकरणांमध्ये गुन्हा ही दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये जिल्ह्यात बालविवाह निर्मूलनाकरीता जनजागृतीसाठी कार्यक्रम घेण्यात येत आहेत. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कायद्याची जाणीव व्हावी यासाठी तसेच बाल वयात बाल हक्कांपासून वंचित राहू नये म्हणून सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे कामकाज सुरु आहे.

**१ लाख रुपये दंड व २ वर्ष शिक्षा**

बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ या कायद्यान्वये मुलीचे वय १८ वर्षे तर मुलाचे वय २१ वर्षाच्या आत असतांना विवाह केला तर असा विवाह बालविवाह म्हणून गणला जातो. त्यासाठी १ लाख रुपये आर्थिक दंड व २ वर्षे सक्त मजूरीची शिक्षा किंवा दोन्ही असे शिक्षेचे प्रावधान आहे.

**गावपातळीवर ग्रामसेवक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी**

ग्रामपंचायतीसाठी ग्रामसेवक तर नागरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) हे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून शासनाने घोषित केले आहे. आपल्या परिसरात वा गावात बालविवाह होत असल्याचे निदर्शनास आल्यास आपण संबंधितांकडे माहिती देऊ शकता. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते.

**हेल्पलाईन १०९८ किंवा ११२**

जिल्ह्यात कोठेही बालविवाह होत असतील किंवा होऊ घातले असतील तर नागरिकांनी अशी माहिती चाईल्ड हेल्प लाईन १०९८ किंवा ११२ या क्रमांकावर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल. बालविवाहाबाबतची माहिती जवळचे पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती, बाल कल्याण समिती, जिल्हा बालसंरक्षण कक्ष तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचे कार्यालय येथेही देता येईल. नागरिकांनी आपल्या जवळपास होणारे विवाह जर बालविवाह असतील तर त्याची माहिती द्यावी असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. एन. चिमंद्रे यांनी केले आहे.

# ६६ प्रवासी घेऊन निघालेली बस घाटात पलटली, भीषण अपघातानंतर स्थानिकांची धाव, ८ जखमी

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बसची दूरवस्था झाल्यावरुन नेहमीच टीका करण्यात येत असते. बसमधून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो, कधी बसचं सीटच हलत असतं, तर खिडकीच्या काचा थडथड वाजत असतात, तर कधी पावसाळ्यात पत्र्यातून पाणीच बसमध्ये शिरते. मात्र, कधी कधी याच बसच्या दयनीस अवस्थेमुळे वाहक-चालकही खासगीत संताप व्यक्त करतात. त्यामुळे, काहीवेळा ह्या बस अपघाताचे कारणही ठरतात. तर, गेल्या काही दिवसांत अपघातांच्या घटनातही वाढ झाल्याचे दिसून येत आहे. नुकतेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजिंठा घाटात एसटी बसचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे.

बसचालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस पलटी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या बसमधून ६६ प्रवासी प्रवास करत होते. तब्बल ६६ प्रवासी घेऊन जाणाऱ्या या बसला अपघात झाला असून अपघातात ७ ते ८ जण जखमी झाले आहेत. पुणे ते रावेर प्रवास या मार्गावरुन ही बस धावत होती.

मात्र, अजिंठा घाटात येताच, चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात ७ ते ८ प्रवासी जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच, स्थानिकांनी व पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेऊन मतदकार्य सुरू केले. अपघातामधील जखमी प्रवाशांना उपचारासाठी अजिंठा येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले आहे. तर, काही जणांना खासगी रुग्णालयाही उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, बस रस्त्यावरुन खाली घसरल्याने पलटी होवून बसचेही मोठे नुकसान झाले आहे. बसच्या पुढील व पाठीमागील बाजूच्या काचा फुटल्या असून टायरही निखळल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी आगार प्रमुखांना माहिती देण्यात आली आहे. त्यानंतर, आगारीतल संबंधित अधिकाऱ्यांनाही घटनास्थळी जाऊन पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते, त्यानुसार अधिकाही अपघातस्थळी पोहोचल्याचं दिसून आलं.

## मतदार जनजागृतीसाठी रेल्वेस्थानकावर दि. ६ ते ८ चित्रप्रदर्शन

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाअंतर्गत केंद्रीय संचार ब्युरो यांच्या वतीने सोमवार दि.६ पासून छत्रपतीसंभजीनगर रेल्वेस्थानक येथे मतदार जनजागृतीसाठी चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.६ रोजी सकाळी ११ वाजता या प्रदर्शनास सुरुवात होणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. बुधवार दि.८ पर्यंत हे प्रदर्शन नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध राहणार आहे,असे क्षेत्रीय प्रचार अधिकारी प्रदीप पवार यांनी कळविले आहे.

## रुक्मिणीबाई उत्तमराव जाधव यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- संचालक (माहिती) कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील सेवानिवृत्त ध्वनीमुद्रक श्री.सुनील जाधव यांच्या मातोश्रीं रुक्मिणीबाई उत्तमराव जाधव वय-८६, यांचे आज दुपारी १.१५ वाजता निधन झाले आहे. त्यांचा अंत्यविधीचा कार्यक्रम उद्या म्हणजेच दि.०४ मे, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता रमानगर स्मशानभूमी, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

## जैन टॅग तर्फे आयोजीत भजन संध्येला उत्स्फुर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जैन टॅग या ग्रुप तर्फे भगवान महावीर जन्मकल्याणकाचे औचित्य साधुन हिराकाका प्रांगण येथे भजन संध्या आयोजीत करण्यात आली होती. हि भजन संध्या सुप्रसिध्द भक्तीगीतकार मेहुल रुपाडा यांनी उत्कृष्ट रित्या धार्मिक भजन साधन करुन उपस्थितांनी मने जिंकली. सर्व प्रथम अतिथीच्या हस्ते भगवान महावीरांच्या फोटोसमोर दिप प्रज्वलन व माल्यार्पन करण्यात आले. यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन नेत्रजा कासलीवाल यांनी केले. तसेच जैन टॅगच्या अध्यक्षा रिचा कासलीवाल, सचिव पुजा झांजरी, उपाध्यक्षा श्श्वेता कासलीवाल, कोषाध्यक्षा पुर्वा कासलीवाल, संस्थापिका अध्यक्षा अनुपमा दगडा, दिपीका बडजाते यांच्या अथक परिश्रमाने हि भजन संध्या आयोजीत करण्यात आली होती. या भजन संध्येमध्ये मेहुल रुपाडा यांनी आयेगे महावीर आयेगें महावीर या भजनावर उपस्थितांची मने जिंकली. तसेच भक्ती की रात है, पनकिडा तो उड के जाना पावापुरी रे आदी अनेक भजन सादर करुन उपस्थितांना नृत्य सादर करायला भाग पाडले.

यावेळी जन्मकल्याणक महोत्सवाचे अध्यक्ष निलेश पहाडे, रवि लोढा, निलेश जैन प्रतिक साहूजी पंचायत अध्यक्ष ललीत पाटणी, सकल जैन समाजाचे महासचिव महावीर पाटणी,न्या.कैलासचंद चांदीवाल, अशोक अजमेरा, विनोद लोहाडे, मिठालाल कांकरिया, मनिषा भंसाली राजेश मुथा प्रतिक कासलीवाल यांच्यासह सकल जैन समाजाचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# ट्रॅव्हल्समध्ये तरुणीसोबत वृद्धाकडून आक्षेपार्ह कृत्य, तरुणीने बस नेली थेट पोलिस ठाण्यात

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- नागपूर ते पुणे प्रवासादरम्यान खासगी ट्रॅव्हल्समध्ये ६४ वर्षीय वृद्धाने २२ वर्षीय तरुणीसोबत आक्षेपार्ह कृत्य केले. त्यामुळे तरुणीला झोपेतून जाग येताच तिला संताप अनावर झाला. तिने तत्काळ पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला संपर्क करून जालन्यावरून शहरात येत बस थेट एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात नेली. तिच्या तक्रारीवरून याप्रकरणी मंजित भागसिंग अहलुवालिया (६४, रा. नागपूर) वर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

अभियांत्रिकीची विद्यार्थी असलेली २२ वर्षीय तरुणी पुण्यात वास्तव्यास असते. एका परीक्षेसाठी ती २८ एप्रिल रोजी नागपूरला गेली होती. रात्री तिने प्रसन्ना पर्पल ट्रॅव्हल्सद्वारे नागपूर-पुणे प्रवास सुरू केला. तिच्या शेजारच्या सीटवर मंजित होता. १ वाजता तरुणीला स्पर्श होत असल्याचे जाणवले. सुरुवातीला तिने दुर्लक्ष केले. मात्र, काही वेळाने जालन्याच्या आसपास तिला पुन्हा पायाला स्पर्श झाला. मंजितकडून जाणीवपूर्वक स्पर्श होत असल्याचे जाणवल्याने तिने थेट चालकाला बस थांबवण्यास सांगितले. गाढ झोपेत असलेले अन्य प्रवासी देखील यामुळे जागे झाले. त्यानंतर तिने कुटूंबाला हा प्रकार कळवून थेट छत्रपती संभाजीनगर पोलिस नियंत्रण कक्षाला संपर्क करून घडलेला प्रकार सांगितला. पोलिसांनी घटनाक्रम समजून घेत एमआयडीसी सिडको पोलिसांना घटनेची दखल घेण्याची सूचना केली.

एमआयडीसी सिडकोचे सहायक फौजदार दशरथ जाधव यांनी तत्काळ मुलीला संपर्क केला. सहकाऱ्यांसह ते विमानतळाजवळ बसची वाट पाहत होते. पहाटे ४ वाजता बस शहरात आल्यानंतर सर्व प्रवाशांसह बस पोलिस ठाण्यात नेण्यात आली. जाधव यांनी दोघांसह सहप्रवाशांकडे चौकशी केली. परंतु, अन्य प्रवाशांनाही उशीर होत असल्याने मुलीने पुण्यात जाऊन गुन्हा दाखल करण्याबाबत लिहून दिले. मंजित यांनी देखील पोलिसांसमोर कृत्य केल्याचे नाकारले. तिने मुलीला चुकीने स्पर्श झाल्याचे सांगत विनवण्या केल्या. तरुणी मात्र तक्रार देण्यावर ठाम होती. पुण्यात गेल्यावर तिने गुन्हा दाखल केला. १ मे रोजी तेथून तो एमआयडीसी सिडको ठाण्यात वर्ग करण्यात आला. सहायक फौजदार विष्णू मुंढे अधिक तपास करत आहेत.

(पान १ वरुन)

### उद्रेक होऊ देऊ नका, जास्त दिवस...

दिला. याशिवाय सुप्रिया सुळेंनी अजित पवारांवरही निशाणा साधला आहे. आमच्या खानदानाचे वाभाडे निघतील ते मी होऊ देणार नाही. नाती सांभाळायला शक्ती लागते तोडायला लागत नाही. प्रेमाने मागितले असते तर हसत हसत सर्व काही दिले असते. या जागेवर नेहमी आपली सांगता सभा होत असते. मात्र यावेळी सांगता सभेसाठी दुसऱ्यांनी बुकिंग केले आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, विरोधी पक्षात आल्यापासून जास्त टाळ्या आता मिळतात. माझा बाप थकला नाही श्रमलेला आहे. शरद पवार कृषी मंत्री असते तर कांदा, दूध दर मिळाला असता. शेतकरी कर्जमाफी झाली असती. २०१४ मध्ये आमची आई म्हणायची तुमचे सरकार येत नाही आणि खरंच सरकार नाही आले. आमच्या आईची आता कटकट वाढली आहे. आता ती म्हणते आता सरकार जाईल, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

### शिवसेना फोडल्याने बाळासाहेबांचा....

असेही वडेट्टीवारांनी म्हटले आहे.

दरम्यान, एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना बाळासाहेबांचे माझ्यावर अतिशय प्रेम होते. मी ते कधीच विसरू शकत नाही. माझी बाळासाहेबांवर श्रद्धा आहे, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बाळासाहेब ठाकरेंच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी मोदी भावुक झाल्याचेही पाहायला मिळाले होते. त्यानंतर शिवसेना-भाजप पुन्हा एकत्र येणार का अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या. यावरच वडेट्टीवार यांनी भाष्य केले आहे.

### पतीने पत्नीशी अनैसर्गिक संबंध...

आहे. यामध्ये कायदेशीर पद्धतीने विभक्त झाल्यानंतर किंवा वेगळे राहत असलेल्या पत्नीबरोबर लैंगिक कृत्य केलं तर त्यास बलात्कार म्हणता येईल.

लाईव्ह लॉच्या अहवालानुसार मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने म्हटलं आहे की, कोणत्याही पुरुषाने १५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या त्याच्या पत्नीबरोबर शरीरसंबंध निर्माण केल्यास किंवा लैंगिक कृत्य केल्यास त्याला आपण बलात्कार म्हणू शकत नाही.

न्यायमूर्ती अहलूवालिया म्हणाले, महिलेच्या गुद्द्वारात पुरुषाचं जननेंद्रिय घुसवणे हे कृत्य बलात्काराच्या व्याख्येत समाविष्ट करण्यात आलं आहे. मात्र हे कृत्य पतीनेच त्याच्या पत्नीबरोबर केलं असेल तर याला बलात्कार म्हणता येणार नाही. अशा स्थितीत पत्नीच्या संमतीला महत्त्व नसतं.

एका महिलेने तिच्या पतीविरोधात बलात्काराची तक्रार केली होती. त्यानुसार दाखल केलेल्या गुन्ह्याप्रकरणी मध्य प्रदेश उच्च न्यायालयात आज (३ मे) सुनावणी पार पडली. महिलेने तिच्या पतीवर बलात्कारासह भारतीय दंड विधानाच्या कलम ३७७ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. तिने पतीवर अनैसर्गिक शरीर संबंध निर्माण केल्याचा आरोप केला होता. खरंतर कलम ३७५ अंतर्गत कोणत्याही महिलेशी तिच्या सहमतीविना शरीरसंबंध निर्माण करणे हा गुन्हा आहे. मात्र यामध्ये दोन अपवादही आहेत. १५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या आणि पतीबरोबर राहत असलेल्या पत्नीशी पतीने संभोग केला असेल तर ती महिला पतीविरोधात बलात्काराची तक्रार दाखल करू शकत नाही.

### मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र...

ओबीसी कल्याण संघटनेचे मंगेश ससाणे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर प्रत्युत्तर सादर केलं आहे का अशी विचारणा मुख्य न्यायमूर्तींनी राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी केली. त्यावर प्रत्युत्तर सादर झालेले नाही, असे महाधिवक्ता सराफ यांनी सांगितले. याची नोंद घेत हायकोर्टाने या याचिकेवर पुढील सुनावणी ही २७ जूनपर्यंत थांबवली आहे.

### मोदींचे उफाळून आलेले प्रेम...

आघाडीच्या प्रमुख नेत्यांना स्वत:ला जर वाघ म्हणून सिद्ध करायाचे असेल तर त्यांनी मविआचे उमेदवार चंद्रहार पाटील त्यांना सगळ्यांनी मिळून विजयी केले पाहिजे. त्यानंतर ४ जूनला आम्ही येऊ आणि सगळ्या वाघांचा सत्कार करू. त्यावेळी आम्ही त्यांना सांगू की तुम्ही वाघ आहात. पण शिवसेना ही सर्टिफाइड वाघ आहे. आमचे बोधचिन्हच वाघ आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी चितारलेले आहे'', असे म्हणत संजय राऊत यांनी टीका केली.

### सुषमा अंधारे यांना घेण्यास आलेले...

लोकसभा निवडणुकीत सुषमा अंधारे या महायुतीच्या स्टार प्रचारक आहेत. महाड येथून त्या बारामती येथे हेलिकॉप्टरमधून जाणार होत्या. हेलिकॉप्टर हे साधारण सकाळी ९ च्या सुमारास आले. हेलिकॉप्टरमध्ये आधीपासूनच काही तांत्रिक अडचण असल्याची माहिती आहे. कारण ज्यावेळी हेलिकॉप्टर घेण्यासाठी आले त्यावेळी ते बराच वेळ हवेत होते. खाली उतरण्याच्या प्रयत्नात असताना हेलिकॉप्टर क्रॅश झाले आणि हेलिकॉप्टरचे पंखा तसेच इतर महत्वाच्या भागांचे तुकडे झाले.

### गद्दारांसाठी आमचे दरवाजे कायमचे...

स्पायवेअर प्रत्येकाच्या मोबाइलमध्ये असेल. आपल्या घरातील कॅमेऱ्यांचा एक्सेसही त्यांच्याकडे असेल. तुमच्यावर २४ तास पाळत ठेवली जाईल आणि तुम्हाला आवडणारे पदार्थ खाण्यापासून आणि आवडते कपडे घालण्यापासून रोखण्यात येईल. गेल्या काही काळापासून ज्याप्रकारे चीन लडाखमध्ये घुसखोरी करत आहे, त्यावर एक चकार शब्दही भाजपाकडून उच्चारला जात नाही. किंबहुना चीनप्रमाणेच एक पक्ष, एक शासन आणण्यासाठी भारत त्यांचे अनुकरण करत आहे, असा हल्लाबोल आदित्य ठाकरेंनी केला.

### पवनराजे हत्या प्रकरण फास्टट्रॅक...

मी या आधी पद्मसिंह पाटील, राणा जगजितसिंह पाटील यांचा पराभव केला आहे. त्यामुळे आता अर्चना पाटील यांचा देखील पराभव करणार असल्याचे ओमराजे निंबाळकर यांनी म्हटले आहे.

मला राजकारणात यायचे नव्हते. मात्र, माझ्या वडिलांची हत्या करून तुम्ही मला राजकारणात येण्यास भाग पाडले. मी शपथ घेऊन राजकारणात आलो आहे, असा दावा देखील ओमराजे निंबाळकर यांनी केला आहे. मला माझ्या वडिलांच्या हत्तेचा सूड घ्यायचा आहे. मात्र, मी तो लोकशाही मार्गानेच घेणार असल्याचा इशारा त्यांनी पद्मसिंह पाटील आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिला आहे.

## कोपर्डी आत्महत्या प्रकरणी दोन आरोपींना अटक

अहमदनगर दि.३ (प्रतिनिधी)- विवस्त्र करून मारहाण करण्यात आल्याने कोपर्डी (ता. कर्जत) येथील दलित तरुणाने आत्महत्या केली, यासंदर्भात तीनपैकी दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. बंटी बाबासाहेब सुद्रिक व वैभव मधुकर सुद्रिक अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. आणखी एका आरोपीच्या अटकेसाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. सध्या कोपर्डी गावात शांतता असून गावात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी विवेकानंद वाखारे यांनी ही माहिती दिली. या गुन्ह्याचा तपास वाखारे करत आहेत. या घटनेने कोपर्डी गाव पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. सन २०१६ मध्ये कोपर्डी येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचा खून केल्याच्या घटनेने देश पातळीवर प्रतिक्रिया उमटल्या होत्या. दोन दिवसांपूर्वी कोपर्डी गावातील तमाशामध्ये नाचण्याच्या कारणावरून विठ्ठल उर्फ नितीन कांतीलाल शिंदे (३७) याला तिघांनी जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. त्यानंतर गोंधळ निर्माण होऊन तमाशा बंद पडला. नितीन घरी परतत असताना रस्त्यात त्याला तिघांनी अडवले व गावातील स्मशानभूमीमध्ये नेत त्याला विवस्त्र केले, मारहाण केली, त्याच्याकडील मोबाईल काढून घेतला.

## केजरीवालांच्या जामीनावर विचार होऊ शकतो-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- सध्या लोकसभेची निवडणूक सुरु आहे. त्यामुळे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जामीन देण्यावर विचार करता येऊ शकतो असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. न्यायाधीश दीपांकर दत्ता, आणि न्यायाधीश संजीव खन्ना यांचं खंडपीठ केजरीवाल यांच्या अंतरिम जामिनावर निर्णय देऊ शकतं. जामीन अर्जावर आता ७ मे रोजी सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने ईडी आणि अरविंद केजरीवाल यांचे वकील यांनी सुनावणीच्या तयारीत रहावं असं म्हटलं आहे. बार अँड बेंचने याबद्दलचं वृत्त दिलं आहे. अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर ७ मे रोजी सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालय अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर विचार करेल. सर्वोच्च न्यायालय पुढच्या सुनावणीच्या दरम्यान अंतरिम जामीन कुठल्या अटींवर मिळतो ते देखील ईडीने तयार ठेवायचं आहे असंही स्पष्ट करण्यात आलं आहे. आम्ही त्या दिवशी म्हणजेच ७ मे रोजी अंतरिम जामीन द्यायचा की नाही द्यायचा हे आपण ठरवू असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.